# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O Office, Palghar
**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**


## प्रेसनोट दि.१२/०७/२०१८

## पालघर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दरोडयाच्या गुन्हयातील आरोपीत यांना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना यश

पालघर पोलीस ठाणे गु.र.नं. ०१२७/२०१८ भादविसंक ३९५, ३४१ हा गुन्हा दि.०४/०६/२०१८ रोजी रात्रौ २२.१० वाजण्याचे सुमारास मौजे पालघर बोईसर रोडवर घडलेला आहे. यातील फिर्यादी श्री. गोपाल लुटावन शर्मा, वय ५२ वर्षे, रा. पालघर हे त्यांचे पेट्रोल पंपावरील रोख रक्कम ५,५०,०००/- रु. घेवुन त्यांचे मोटार सायकलने घरी जात असतांना मोटार सायकलवरुन आलेले ५/६ आरोपीतांनी फिर्यादीची मोटार सायकल अडवून त्यांना लाथ मारुन, खाली पाडुन त्यांचेकडील रोख रकमेची बॅंग जबरदस्तीने हिसकावून दरोडा टाकुन चोरी करुन चोरुन नेलेली आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. मंजुनाथ सिंगे, मा. श्री. योगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, मा. श्री. विकास नाईक, उप विभा.पो.अधिकारी पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/किरणकूमार कबाडी, सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रताप दराडे, पोलीस उप निरीक्षक श्री. शरद पवार यांनी सदर गुन्हयाचा तपास करुन, आरोपीत १) रविंद्र अशोक पिंपळे, वय २४ वर्षे, २) प्रदिप जान्या वाढाण, वय २३ वर्षे, ३) सचिन अशोक शिंदे, वय २६ वर्षे, ४) संतोष रघुनाथ चाकर, वय २३ वर्षे सर्व रा. वंकासपाडा ता.जि. पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कसुन चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपीत नंबर १ ते ३ यांना दि. ११/०७/२०१८ रोजी २२.१५ वा. अटक करुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या रोख रकमेपैकी २,३४,४१०/- रु. रोख रक्कम काढुन दिल्याने रोख रक्कम व गुन्हा करतांना वापरलेली बजाज एक्स.सी.डी. मोटार सायकल क्र. एमएच-०४/ ईजी-७६४१ जप्त करण्यात आलेली आहे. गुन्हयातील उर्वरीत आरोपी व रक्कम आणि गुन्हा करतांना वापरलेल्या मोटार सायकलीबाबत अधिक तपास चालू आहे.

**पोलीस अधीक्षक पालघर, करिता**